# गुरुराज नं २ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
# (गंधर्वनगरी)

**३०/अ, ४अ, डहाणूकर कॉलनी, कोथरूड, पुणे ४११०३८.**

नोंदणी क्रमांक : एच एस जी (टी सी) / १०१ / १९९२-९३ दिनांक ४ जून १९९२.

**जावक क्रमांक : MC/2022/09/AGM/Notice/03** **दिनांक : ११/०९/२०२२.**

---

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना (नोटीस)

### फक्त सभासदांसाठी

आपल्या उपरोक्त संस्थेची ३१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा L इमारतीच्या पार्किंग मध्ये रविवार दिनांक २५ सप्टेंबर २०२२ रोजी संध्याकाळी ४.३० वाजता होणार असून सभेमध्ये पुढील कामकाज होईल. तरी सर्व सभासद बंधुभगिनींनी कृपया या सभेस आवर्जून उपस्थित राहावे व कामकाजात सहभाग घ्यावा ही विनंती.

१. दिवंगत सभासदांना श्रद्धांजली वाहणे.
२. दिनांक २७ मार्च २०२२ रोजी झालेल्या ३० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून त्यावर चर्चा करून कायम करणे.
३. आर्थिक वर्ष २०२१-२२ चे जमा-खर्च पत्रक व ताळेबंद याला मंजुरी देणे.
४. आर्थिक वर्ष २०२१-२२ चे मा. लेखापरीक्षक श्री. अशोक ए मारणे यांचेकडून प्राप्त झालेल्या लेखा परिक्षण अहवालाची नोंद घेणे.
५. आर्थिक वर्ष २०२१-२२ लेखापरीक्षण दोष दुरुस्ती अहवालाची (O-Form) नोंद घेऊन तो संबंधीतास पाठवण्यास मंजुरी देणे.
६. आर्थिक वर्ष २०२२-२३ च्या लेखा परिक्षणासाठी लेखापरीक्षकाची नियुक्ती करणे.
७. दिनांक ०१/०३/२०२२ ते १०/०९/२०२२ ह्या कालावधी मध्ये व्यवस्थापन समितीने मंजूर केलेल्या फ्लॅट हस्तांतरण प्रकरणास तसेच नवीन सभासदस्यत्व देणे यांस अंतिम मंजुरी देणे.
८. शनिवार दिनांक २४ सप्टेंबर २०२२ पर्यंत सभासदांकडून आलेल्या लेखी सूचनांचा विचार करणे. सभासदांनी लेखी सूचना ऑफिस पेटीत टाकणे किंवा ई-मेल द्वारे पाठवणे (gururajno2.gandharva@gmail.com) आवश्यक आहे.

९. सोसायटी इमारतींच्या गळती समस्येवर योग्य ती कार्यवाही करणे व त्या खर्चास मान्यता घेणे
१०. सोसायटी इमारतींच्या ड्रेनेज लाइन समस्येवर योग्य ती कार्यवाही करणे व त्या खर्चास मान्यता घेणे
११. A इमारतीवरील टाकीच्या गळतीच्या (Leakage) व संरचनात्मक स्थिरता (Structural Stability) या समस्यांवर चर्चा करून योग्य ती कार्यवाही करणे व त्या खर्चास मान्यता घेणे. (जर सोसायटी टाकीच्या गळतीचे आणि संरचनात्मक स्थिरता परीक्षणाचा खर्च करणार नसल्यास, वर्गणीरूप घेतलेल्या रक्कमे

Gururaj No. 2 Sahakari Griharachana Sanstha Maryadit
Regn. No. PNA/HSG/(T.C.)/101/92-93 DT. 4-6-92

४०००/- प्रत्येकी संबंधित परतावा देण्यासंबंधी चर्चा करून योग्य तो निर्णय घेणे व पुढील कार्यवाही करणे).

१२. शासनाच्या नियमाप्रमाणे ३० वर्षांपुढील इमारतींचे संरचनात्मक लेखापरीक्षण (Structural Audit) दर ३ वर्षांनी करून घेणे बंधनकारक असल्याने, सोसायटी इमारतींचे संरचनात्मक लेखापरीक्षण (Structural Audit) करून घेण्यास चर्चा करून खर्चास मंजुरी घेणे.

१३. कॉर्पोरेशन कडून आलेल्या नोटीसची दखल घेऊन, कचरा वर्गीकरण आणि गांडूळखत प्रकल्पाबाबत चर्चा करून योग्य ती कार्यवाही करणे.

१४. पुनर्विकास कामाचा आढावा घेणे व पुढील कार्यवाहीची रूपरेषा ठरवणे.

१५. ऐनवेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे

१६. सर्व सभासदांचे आभार प्रदर्शन.

## : विशेष सूचना :

१. सभा रविवार दिनांक २५ सप्टेंबर २०२२ **रोजी संध्याकाळी ठीक ४.३० वाजता सुरु होईल. आवश्यक गणसंख्या पूर्ण झाली नाही तर सभा स्थगित केली** जाईल. या स्थगित सभेचे कामकाज त्याच दिवशी व त्याच ठिकाणी **संध्याकाळी ५.०० वाजता** पुन्हा सुरु होईल. त्यावेळी मात्र गणसंख्यापुर्तीची आवश्यकता नसेल. सभेत वरील विषयांवर चर्चा व विचार केला जाईल. तसेच या सभेत घेण्यात आलेले सर्व निर्णय सर्वच सभासदांवर बंधनकारक रहातील याची कृपया नोंद घ्यावी. सभेस सभासदांनी वेळेवर व आवर्जून उपस्थित राहावे हि विनंती.

२. सोसायटीच्या नियमाप्रमाणे सदरहू सभेला फक्त सभासदांनाच सभेच्या कामकाजात भाग घेता येईल. जे सभासद वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहू शकणार नाहीत व त्यांच्या वतीने घरातील इतर व्यक्ती सभेत उपस्थित राहावयाचे असल्यास त्यांच्याकडील संस्थेने दिलेले सहयोगी सभासदत्वाचे प्रमाणपत्र आधीच सोसायटी ऑफिसमध्ये किंवा ई-मेल द्वारे पाठवणे (gururajno2.gandharva@gmail.com) आवश्यक आहे. सहयोगी सभासद सभेला उपस्थित राहू शकतील. पण त्यांना सभेच्या कामकाजात कोणताही भाग घेता येणार नाही याची नोंद घ्यावी.

३. शासनाच्या अध्यादेशानुसार वार्षिक सर्वसाधारण सभेच्या कार्यक्रमात जर काही बदल करावे लागले तर त्याची पूर्वसूचना सभासदांना देण्यात येईल.

Gururaj No. 2 Sahakari Griharachana Sanstha Maryadit
Regn. No. PNA/HSG/(T.C.)/ 101/92-93 DT. 4-6-92

| | | |
|---|---|---|
| (समीर पुणेकर) | (वैभव देशपांडे) | (विक्रमसिंह देसाई) |
| सचिव | खजिनदार | अध्यक्ष |
| व्यवस्थापकीय समिती | व्यवस्थापकीय समिती | व्यवस्थापकीय समिती |